MHAU100003492016

नियमित दिवाणी दावा-२७/२०१६
**शेख रफीक वि. शेख गुलाब.**

निशाणी ४३ वरील आदेश

वादीने आदेश २६ नियम १६ सहकलम १५१ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या ताब्यात असलेल्या जमिनीची संयुक्तीक मोजणी करण्याकरीता सक्षम अधिकारी उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय खुलताबाद यांना नियुक्त करण्याबाबत सदरील अर्ज दाखल केला. त्यामधे वादीने असे कथन केले की, वादीने दावा १७ आर जमीनीवर प्रतिवादीने केलेले अतिक्रमण काढून ताब्यासाठी दाखल केला. प्रतिवादी हे दाव्यात हजर होवुन लेखी जबाब दाखल केला व अतिक्रमण केल्याचे नाकारले. त्यामुळे संयुक्तीक मोजणी करण्याचे नमूद केले.

**०२.** वादीने पुढे असे कथन केले की, यापूर्वी कोर्ट कमिशनर मार्फत सयुक्तीक मोजणीचा अर्ज दिला परंतु कोर्ट कमिशनर यांनी न्यायालयाने आदेशाप्रमाणे मोजणी न करता मोघम स्वरुपाची मोजणी केली. केवळ वादी यांच्या क्षेत्राची मोजणी करुन व सयुक्तीक मोजणी झाल्यानंतर १७ आर क्षेत्र कमी भरते असे दर्शविले परंतु ते क्षेत्र वादी यांच्या चतूर्सीमेतील कोणत्या भुधारकाकडे किती क्षेत्र निघते व कोणी अतिक्रमण केले हे दर्शविलेले नाही. तसेच प्रतिवादी यांच्या ताब्यात असलेल्या क्षेत्राची मोजणी केली नाही. त्यामुळे सदरच अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

**०३.** याउलट प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे मांडून सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. प्रतिवादीने असे कथन केले की, वादीने सदर प्रकरणात नि.क्र. ४१ वर साक्षीदार तपासला व सदर साक्षीदाराची सरतपासणी बघता वादीने मोजणी नकाशा व अहवाल मान्य केले. अशा परीस्थीतीत वादी याचा पुन्हा सयुक्तीक मोजणी करण्यासाठीचा

अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकूण अर्ज व म्हणणे पाहिले. वादीने सदरचा दावा प्रतिवादीने केलेले अतिक्रमण काढून ताबा मिळण्याबाबत दाखल केला. वादीने असे कथन केले की, यापूर्वी कोर्ट कमिशनरची नियुक्ती सयुक्तीक मोजणी करीता केली. परंतु न्यायालयाच्या आदेशाप्र्माणे मोजणी करुन अहवाल दिला नाही. याउलट प्रतिवादीने असे कथन केले की, कोर्ट कमिशनर नेमलेल्या व्यक्तीला वादीने तपासणे व तपासा दरम्यान अहवाल व नकाशा मान्य केला. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. सदरचा अर्ज निर्णीत करण्याकरीता वादीला कोर्ट कमिशनरने केलेली मोजणी ही न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे केली नसून त्यामधे काहीही स्पष्ट झालेले नाही व सदर अहवाल हा अस्पष्ट आहे, ही बाब न्यायालयाच्या निदर्शणास आणणे गरजेचे आहे. सदरचा अर्ज मंजूर करणे हा न्यायालयाचा ऐच्छीक अधिकार असला तरी याचा वापर पुरावा गोळा करण्याकरीता करता येत नाही. यापूर्वी वादींचा अर्ज मंजूर असून त्याबाबतचा अहवाल नि.क्र. १८ वर आहे. तसेच पंचनामा व नकाशा सोबत दाखल केलेला आहे. वादीने नि.क्र. ४१ वर संबंधित कोर्ट कमिशनर जगन्नाथ धोंडीबा वाघ याला तपासले. सदर साक्षीदाराचे साक्ष पाहिली असता वादीने नि.क्र. १८ अहवाल मान्य केल्याचे दिसून येते. वादीने त्याच्या पुराव्यामधे साक्षीदाराने न्यायालयाच्या विसंगत किंवा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणी केली नसल्याचे अभिलेखावर ती बाब आणल्याचे दिसून येत नाही. वर उल्लेख केल्याप्रमाणे वादीने पुनर्नियुक्ती करण्याकरीता ही बाब अभिलेखावर आणणे गरजेचे होते. त्यामुळे सदर अर्जातील कथने समाधानकारक नसल्याने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2025.12.09 17:39:51 +0530

दिनांक ०९.१२.२०२५

**( जी.डी. गुरनुले)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खुलताबाद.